# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १३८ वा ❑ रविवार दि.१३ जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## देवाचिये द्वारी.... असे भ्रष्टाचारी !

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्यं

देवळे, मशिदी, गुरुद्वार, चर्चेस, प्रार्थनामंदिरे यांचे श्रद्धेशी निकटचे नाते आहे, पण 'मानवी श्रद्धा' हादेखील अलीकडे पैसे कमवण्याचा मार्ग झाला आहे. समाजाच्या सर्व क्षेत्रांत पसरलेला भ्रष्टाचार देवाच्या द्वारी आणि घरी पोचला आहे. शनि शिंगणापूर मंदिरात झालेल्या भ्रष्ट्राचाराने देवाचिये द्वारी....असे भ्रष्टाचारी ! असे म्हणण्याची वेळ परत एकदा आली आहे.

ज्या मंदिरात देशभरातून भाविक आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी आणि पापांची क्षमा मागण्यासाठी जातात, त्या शनि शिंगणापूरच्या मंदिरात सर्वकाळाचे स्वामी असलेल्या भगवान महाकालच्या दरबारात दररोज ५०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याची बातमी समोर आली आहे.२०२३ मध्ये चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिंगणापूर मंदिरातील

भ्रष्टाचाराचा मुद्दा समोर आणला होता..सामान्य जनता आणि भाविकांची फसवणूक केल्याचा आरोप मंदिर ट्रस्टवर आहे. हा मुद्दा उचलून धरुन भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी अनेक आरोप केले होते. महाराष्ट्राचे तेव्हाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश देखील दिले होते.मात्र भ्रष्टाचाराचा हा मुद्दा फारशा गांभीर्याने घेण्यात आला नाही. परिणामत: भ्रष्टाचार होतच राहिला. आता परत एकदा हा प्रश्न समोर आला.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध शनि शिंगणापूर देवस्थान हे संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. इथे देवाच्या नावावर मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका चौकशी समितीच्या अहवालातून हे भीषण वास्तव उघड झाले आहे. देवस्थानच्या कारभारात २४४७ बोगस कर्मचारी दाखवून कोट्यवधींचा घोटाळा केल्याचा आरोप आहे.

शनि शिंगणापुरातील एकाही घराला कडी-कोयंडा नाही. तिथे चोरी होतच नाही कारण चोरांना शनिदेव शिक्षा करतो अशी श्रद्धा इथल्या लोकांमध्ये आहे. याच शनि मंदिराचे कामकाज पाहणाऱ्यांनी शनिदेवाच्या डोळ्यादेखत कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केला आहे. या चोरांना शनिदेव आता काय शिक्षा देतो याची उत्सुकता शनि-शिंगणापूरवासीयांना आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध शनि शिंगणापूर देवस्थान हे संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. इथे देवाच्या नावावर मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका चौकशी समितीच्या अहवालातून हे भीषण वास्तव उघड झाले आहे. देवस्थानच्या कारभारात २४४७ बोगस कर्मचारी दाखवून कोट्यवधींचा घोटाळा केल्याचा आरोप आहे. याप्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल मुख्यमंत्र्यांना प्राप्त झाला असून त्यांनी इथे घोटाळा कसा झाला त्याच्या सगळ्या डिटेल्स सभागृहातच सांगितले.

अदृश्य बागेच्या देखरेखीसाठी ८० जण

देवस्थान आतापर्यंत २५०ते ३०० कर्मचाऱ्यांवर व्यवस्थित चालत होते. मात्र घोटाळेबाजांनी कागदोपत्री २४४७ कर्मचारी नियुक्त केल्याचे दाखवले. हे सर्व कर्मचारी बोगस होते. देवस्थानच्या रुग्णालयात ३२७ कर्मचारी कार्यरत असल्याचे कागदोपत्री दाखवले होते. प्रत्यक्षात तपासणीत रुग्णालयात एकही रुग्ण नव्हता. १५ खाटा, ८० वैद्यकीय आणि २४७ अकुशल कर्मचारी असे दाखवले असताना, प्रत्यक्षात केवळ ४ डॉक्टर आणि ९ कर्मचारी हजर होते. अस्तित्वात नसलेल्या रुग्णालयाच्या बागेच्या देखरेखीसाठी ८० कर्मचारी दाखवण्यात आले होते.

बोगस ॲप तयार करून भक्तांना लुटले

आमदार विठ्ठल लंघे आणि आमदार सुरेश धस यांनी नकली ॲप तयार करून भाविकांकडून पूजेसाठी त्यावर पैसे घेतले जात असल्याचा प्रकारही सभागृहात उपस्थित केला होता. धस यांनी आरोप केला की या ॲपच्या माध्यमातून किमान ५०० कोटींची रक्कम गोळा करण्यात आली आहे. यावर उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की सायबर पोलीस याचा तपास करत आहेत. धस यांनी आणखी एक आरोप केला असून त्यांनी म्हटले आहे की, बोर्डाचे ट्रस्टी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी दर महिन्याला १० ते २० कोटींची संपत्ती विकत घेतल्याची बाब पुढे येत आहे. यावर बोलताना मुख्यमंत्र्यांनी म्हटले की " देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे की, जे ट्रस्टी लोकसेवक या संज्ञेत येत असतील त्यांच्या अपसंपदेची चौकशी केली जाईल.

शनि शिंगणापूरचा इतिहास

महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात असलेले शनि शिंगणापूर मंदिर अतिशय प्राचीन आहे. पौराणिक मान्यतेनुसार, एकेकाळी श्रावण महिन्यात अतिवृष्टीमुळे तेथील पाण्याची पातळी लक्षणीय वाढली होती. मग पावसात वाहत एक मोठा काळा दगड शिंगणापूरच्या किनाऱ्यावर आला, त्याच रात्री गावप्रमुखाच्या स्वप्नात शनिदेव आला आणि त्याने आपण स्वतः त्या गावात दगडाच्या रूपात आल्याचे सांगितलं. गावप्रमुखाने हे सर्व गावकऱ्यांना सांगितलं आणि त्यांनी मिळून गावाच्या मध्यभागी शनिदेवाची मूर्ती स्थापन केली.

येथील घरांना कुलूप नाही

मान्यतेनुसार, शनिदेव शिंगणापूरमध्ये आल्यापासून तेथे चोरी किंवा दरोड्याची कोणतीही घटना घडलेली नाही. संपूर्ण जगात हे एकमेव गाव आहे, जिथे आजही घरांना दरवाजे नाहीत. तसेच येथे घरांना कुलूपही लावलेले नाहीत. कथांनुसार, अनेक वेळा लोकांनी तिथे चोरी करण्याचा प्रयत्न केला, परंतु ते अयशस्वी झाले आणि त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागले. आता याच शनि शिंगणापूर मंदिराच्या ट्रस्टवर भाविकांची फसवणूक केल्याचा आरोप होत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. गेल्या काही वर्षांपासून आर्थिक बाबींतील ही अनियमितता सुरू आहे.






# गड जिंकले, महाराष्ट्र जिंकला !

## भेलके महाविद्यालयात किल्ल्यांच्या जागतिक गौरवाचे उत्साहात स्वागत

ज्योतिर्मय साहित्य

**भोर** – ११ जुलै २०२५ रोजी पॅरिस मध्ये झालेल्या जागतिक वारसा समितीच्या ४७ व्या १७ मराठा मिलिटरी लँडस्केप ऑफ इंडिया अंतर्गत महाराष्ट्रातील रायगड, राजगड, प्रतापगड, शिवनेरी, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी, सुवर्णदुर्ग, साल्हेर, लोहगड, पन्हाळा ११ व तामिळनाडू राज्यातील जिंजी अशा एकूण १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ यादीत समावेश झाल्याच्या ऐतिहासिक घडामोडीचा शंकरराव भेलके महाविद्यालयात अभिमानाने जल्लोष साजरा करण्यात आला. गड जिंकले, महाराष्ट्र जिंकला ! या घोषवाक्याखाली आयोजित कार्यक्रमात इतिहास आणि सांस्कृतिक वारशाविषयी जनजागृती व अभिमान व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून तसेच महाराष्ट्र राज्य गीताने



करण्यात आली.

कार्यक्रमात प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांनी हा भारतासाठी विशेषता महाराष्ट्रासाठी एक अत्यंत अभिमानाचा क्षण आहे कारण छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीने बांधलेल्या या किल्ल्यांचे सामरिक स्थापत्य आणि सांस्कृतिक महत्त्व आता जागतिक स्तरावर आधुनिकी झाले आहे अशा शब्दांत त्यांनी आपले मत व्यक्त केले. महाराष्ट्राच्या समृद्ध गडकिल्ल्यांच्या वारशाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी या ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास करावा, गडकोट मार्गदर्शक व्हावे, गडकोटांवर स्वच्छता राखावी असा संदेश दिला. डॉ. सचिन घाडगे यांनी किल्ल्यांचा ऐतिहासिक व स्थापत्यदृष्ट्या असलेला महत्त्वाचा ठेवा विशद केला. प्रा. जाधवर डी. एस. आणि प्रा. रोडे सहदेव यांनीही गडकोटांचे शौर्य, स्वाभिमान व महाराष्ट्राच्या संस्कृतीतील स्थान यावर मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जगदीश शेवते यांनी केले,

तर डॉ. रोहिदास ढाकणे सरांनी उपस्थित मान्यवरांचे, प्राध्यापकांचे व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. या वेळी महाविद्यालयातील प्रा. महेश कोळपे, प्रा. माऊली कोंडे, प्रा. भूषण समगिर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने करण्यात आले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक वारशाविषयी आत्मीयता, अभिमान व जतनाची जाणीव निर्माण झाली.

# छत्रपती शिवरायांच्या किल्ल्यांचा आंतरराष्ट्रीय गौरव प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण-पंतप्रधान नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली** – भारताच्या शौर्यशाली इतिहासाचा आणि सांस्कृतिक वैभवाचा गौरव करणाऱ्या 'मराठा सैन्य लँडस्केप्स' ला युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळाले आहे. या ऐतिहासिक यशामुळे मराठा साम्राज्याच्या रणनीतिक, स्थापत्य आणि ऐतिहासिक महत्त्वाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून, हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण असल्याचे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या यशाबद्दल आनंद व्यक्त केला आहे. सर्व नागरिकांना या किल्ल्यांना भेट देण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या यशाबद्दल अभिमान व्यक्त करताना म्हटले, "मराठा साम्राज्याचा उल्लेख होताच सुशासन, सैन्यशक्ती, सांस्कृतिक गौरव आणि सामाजिक कल्याणाचा आदर्श डोळ्यासमोर येतो. या महान शासकांनी अन्यायाविरुद्ध न झुकण्याची प्रेरणा आपल्याला दिली आहे." त्यांनी २०१४ मध्ये रायगड किल्ल्याला दिलेल्या भेटीची आठवण सांगताना म्हटले, "रायगडावरील ती भेट माझ्यासाठी अविस्मरणीय आहे. तिथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्याची संधी मिळाली." त्यांनी सर्व नागरिकांना या किल्ल्यांना भेट देऊन मराठा इतिहासाची माहिती घेण्याचे आवाहन केले.

या यादीत मराठा साम्राज्याच्या १२ भव्य किल्ल्यांचा समावेश आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ११ किल्लेरायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी आणि तमिळनाडूतील एक किल्लाजिंजी यांचा समावेश आहे. या किल्ल्यांना 'मराठा सैन्य लँडस्केप्स' या संकल्पनेअंतर्गत 'अद्वितीय वैश्विक मूल्य' म्हणून मान्यता देण्यात आली आहे. मराठा स्थापत्यशास्त्रातील माची स्थापत्य, जे गडाच्या सुरक्षिततेसाठी आणि युद्धकौशल्यासाठी अद्वितीय आहे, याला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. हे स्थापत्य जगातील इतर कोणत्याही किल्ल्यांमध्ये आढळत नाही.

या यशामागे केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासनाचे एकत्रित प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरले. पंतप्रधान मोदी यांच्या पाठिंब्याने आणि भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण तसेच संस्कृती मंत्रालयाच्या सहभागाने हा टप्पा गाठता आला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या यशासाठी पंतप्रधान मोदी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, अपर मुख्य सचिव विकास खारगे, भारताचे युनेस्कोतील राजदूत विशाल शर्मा आणि पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे हेमंत दळवी यांचे आभार मानले आहेत. शेलार यांनी युनेस्कोच्या महानिदेशकांची भेट घेऊन तांत्रिक सादरीकरण केले, ज्यामुळे या यशाला गती मिळाली.

मराठा किल्ल्यांचे माची स्थापत्य हे त्यांच्या रणनीतिक आणि अभेद्य रचनेसाठी प्रसिद्ध आहे. शत्रूला न दिसणारे दरवाजे आणि किल्ल्यांचे बांधकाम हे मराठा साम्राज्याच्या युद्धकौशल्याचा आणि मुत्सद्देगिरीचा उत्कृष्ट नमुना आहे. या किल्ल्यांनी स्वराज्याच्या निर्मिती आणि संरक्षणात महत्त्वाची भूमिका बजावली. युनेस्कोच्या मान्यतेमुळे या स्थापत्यशास्त्राला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आहे.

# कतार फॉर्मुला अजब

ज्योतिर्मय साहित्य

**(मागील अंकावरून)**

घेतलेला होरमूझ आखातातील वाहतूक बंदीचा निर्णय म्हणजे एक चांगला धाडसी पवित्रा म्हटला पाहिजे, तसेच अमेरिकेला असे वाटले होते की, इराणवर मोठी हवाई कामगिरी करून त्याचे पेकाट मोडता येईल, पण प्रत्यक्षात तसे घडले नाही. मर्यादित यश प्राप्त करून अमेरिकेला समाधान मानावे लागले. दीर्घकालीन दृष्टीने विचार करता ही मोहीम फार मोठा पराक्रमी विजय नोंदविण्यात यशस्वी झाली, असे म्हणता येत नाही. इस्रायलचा विचार करता बारा दिवसांचे युद्ध नेत्यानेहु जिंकल्याचा दावा करत असले तरीही इराण इजरायल आणि अमेरिका या तिघांनाही संपूर्ण यश आले, असे म्हणता येत नाही. तिघांचे यश मर्यादित आहे. युद्धानंतर प्रत्येक जण आपणच जिंकल्याचा दावा करत आहेत. पण, प्रत्यक्षात हे यश मर्यादित आहे असे लक्षात घ्यावे लागते. कारण संपूर्ण यश किंवा अपयश सिद्ध करणे हे आता नव्या जगात प्रगत तंत्रज्ञानामुळे अशक्यप्राय झाले आहे. त्यामुळे यापुढील काळात युद्धाचे तंत्र झपाट्याने बदलेल आणि युद्धे दीर्घकाळ करणे कोणालाही परवडणार नाही, हे लक्षात घेऊन अमेरिकेने युद्धातून काढता पाय घेतला, ही गोष्ट मानव कल्याणाच्या दृष्टीने निश्चितच उपकारक ठरली आहे. परंतु, दीर्घकालीन विचार करता पक्षांनी बसून शांत डोक्याने विचार करावा. कतारची राजधानी दोहा येथे शिखर परिषद घ्यावी. कोणाचे चुकले-माकले त्याला क्षमा करावी आणि यापुढे एकमेकांवर हल्ले करून मानव जातीचे नुकसान करण्याचे प्रयत्न थांबवावेत. त्यामुळे जीवित आणि वित्तहानी टळेल आणि मानवाचे कल्याण होईल. रोजचा युद्धावर होणारा खर्च जर गरीब देशांच्या कल्याणासाठी झाला, तर या बारा दिवसांच्या युद्धाच्या ऐवजी जर शांतता झाली असती तर जगातील ३ टक्के गरिबी कमी करणे शक्य झाले असते. पण, बड्या राष्ट्रांना या विकसनशील राष्ट्रातील गरिबी व सामाजिक आर्थिक कल्याणाचा विचार सुचणार तरी कसा ? या महासत्तेने युनिसेफ आणि युनेस्कोमधून आपला पैसा काढून घेतला. त्यांच्याकडून मानवाच्या कल्याणाची काय अपेक्षा करावी?

**समारोप**

या सर्व चर्चेवरून हे सिद्ध होते की, कतारच्या युद्धबंदीमध्ये नो मोर वॉर अशी घोषणा करण्यात आली असली तरी देखील झालेली युद्धबंदी किती तकलादू आहे, हे पहिल्या दोन दिवसातच उघड झाले. तकलादु युद्धबंदी कशी टिकणार ? खरे तर कुठलीही शस्त्रसंधी ही जेव्हा निश्चित सूत्रावर आधारित होते, तेव्हाच ती टिकू शकते. तात्पुरती मलमपट्टी






केल्यामुळे वरवर समाधान वाटते, पण क्रॉनिक दुखणे मात्र थांबत नाही. तेव्हा प्रश्न सोडविण्यासाठी मागे एकदा पहिल्या कार्यकाळात ट्रम्प यांनी अब्राहम करार केला होता, अशा प्रकारचा एखादा नवा तोडगा काढावा आणि आखातामधील देशांची अस्वस्थता दूर करावी. इस्रायलला सुद्धा समज द्यावी. त्याला गाझापट्टीवर व पॅलेस्टाईनवर विजय मिळवल्यामुळे अहंकार आला असेल तर तो दीर्घकाळ टिकणारा नसतो, हे लक्षात घेऊन अमेरिकेने इस्रायलला न्याय आणि विवेकी दृष्टीने वर्तन करण्याचा आग्रही सल्ला दिला पाहिजे. नाहीतर ज्याच्या पाठीवर बसून, अमेरिका राजकारण करते त्या चतुर कोल्ह्याने सर्व द्राक्षाच्या बागा आणि तेलाच्या विहिरी आपल्या आहेत, या थाटात राजकारण सुरू केले तर

इस्रायलासुद्धा पतनाला सामोरे जावे लागेल. प्रश्न अमेरिकेच्या प्रभुत्वाचा किंवा पतनाचा नाही, प्रश्न आहे तो एखाद्या देशातील स्थैर्य आणि विकासाठी आखातात शांतता असते आणि विकासासाठी भारताची भूमिका हीच योग्य आहे. त्यासाठी सर्व आखाती देशांनी एकत्र येऊन भारताच्या नेतृत्वाखाली शांतता आणि विकासाचा कार्यक्रम तयार करावा. त्यात इजरायलने सुद्धा सहभागी व्हावे. अमेरिकेसारख्या दुरून डोंगर साजरे म्हणणाऱ्या देशांपेक्षा भारतच आशिया खंडातील तटस्थ रचनात्मक व सक्रिय भूमिका पार पाडू शकतो, हे आखाती देशाने स्वीकारले तर कायम शांतता निर्माण करणे शक्य होईल. पण, अमेरिकेसारख्या किंवा रशियासारख्या राष्ट्राची मध्यस्थी फार काळ शांतता निर्माण करू शकणार नाही. गरज आहे ती भक्कम, निश्चित आणि प्रभावी तोडगा काढण्याची. असा तोडगा काढून आपण शांतता निर्माण करू शकतो. त्यामुळे आखातामधील सर्व देशांनी भारताच्या नेतृत्वाखाली गोलमेज परिषद घ्यावी आणि शांतता व स्थैर्याचा नवा बिंदू गाठावा. गरज आहे ती शांत, संयमी आणि विवेकी नेतृत्वाची. असे नेतृत्व केवळ भारतच देऊ शकतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच या संकटातून मार्ग काढू शकतील. अमेरिका किंवा रशिया यांची भूमिका एकांगी आहे, हे प्रामुख्याने नमूद केले पाहिजे.

या युद्धात इराणमधील ६२७ लोक मरण पावले, तर इस्रायलमधील २८ लोकांना वीरमरण आले, असे वृत्त एएफपी या वृत्तसंस्थेने दिले आहे. इराणच्या कोषात आत्मसमर्पण किंवा शरण हा शब्दच नाही. आपण इराणी जनतेच्या ऐक्याचे कौतुक करतो, असेच खोमेनी म्हणतात. अमेरिका त्याचा आवाज दाबू शकली नाही हेही खरे. भारताचा डायलाग व डिप्लोमसी म्हणजे संवाद व कुटिल नीती हा मार्गच शांतता प्रस्थापित करू शकतो, हाच या युद्धाचा संदेश आहे.

***




## जात्यावरच्या ओव्या......

शेजारणी बाई
उसने देना गहू,
पाहुणे आले बाई
चांद सूर्य दोन्ही भाऊ ॥१६५॥

चांद सूर्याची
दोन्हीची दोस्त दारी
चंद्र गेला मावळया
केली सूर्यानं तयारी ॥१६६॥

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## गार्निशिंग जीवनाचं...




ज्योतिर्मय साहित्य

आपलं जीवनही एका मोठ्या जेवणासारखंच असतं, नाही का ? बालपण म्हणजे तयारी साहित्य जमा करणं, काही अनावश्यक गोष्टी बाजूला करणं. तारुण्य म्हणजे तयारीची धावपळ गॅसवर ठेवलेली आशेची भांडी, प्रेमाचे तळण, काही चूका देखील...हे थोडंसं जळणं आणि पुन्हा प्रयत्न करणं. तर प्रौढत्व म्हणजे अनुभवाची समतोल चव नोकरी, संसार, जबाबदाऱ्या, आनंददायक यश, मधूनच येणारे अपयशाचे खारट थेंब. या सगळ्यातून जमा होणारे अनुभवाचे मौल्यवान मोती ! थाळी समोर आली की काही क्षणात गार्निश संपतं, पण तो क्षण लक्षात राहतो. तसंच, जीवनातले छोट्या आनंदाचे क्षण टिकवणं, आठवणीत साठवणं ही खरी समृद्धी आहे.



पण या सर्वाच्या पलीकडे असतो तो जीवनाचा शेवटचा टप्पा वृद्धत्व. जणू जीवनाच्या थाळीवरचं गार्निशिंग !

कोण म्हणतो वृद्धत्व म्हणजे झिजणं, खंगणं ? वृद्धत्व म्हणजे कुरूपता ? पिकलेलं जाळीदार पानही सुंदर दिसतं ! फक्त आपल्या दृष्टीवर ते अवलंबून असतं. वृद्धत्व म्हणजे खरं तर समाधानाचं गंधर्वभोजन असतं ! वयाच्या सायंकाळी जर मन:शांती असेल, कर्तृत्वाच्या आठवणी, प्रेमाची सोबत आणि आरोग्याची साथ असेल, तर तो शेवट म्हणजे एक सुंदर कलाकृतीपेक्षा कमी नाही.

वृद्धत्व म्हणजे केवळ केस पांढरे होणं नव्हे, तर अंतरात्मा निर्मळ होणं आहे. त्या क्षणी आपण जेव्हा स्वतःकडे पाहू, तेव्हा असं वाटलं पाहिजे ''हो, आयुष्य सुंदर केलं.'' पु ल देशपांडे म्हणतात, ''माणसाच्या आयुष्यातली खरी श्रीमंती ही त्याने उपभोगलेल्या आनंदात असते; आणि ती श्रीमंती त्याच्या चेहऱ्यावर उतरत जाते.'' ती अशावेळी त्याच्या चेहऱ्यावर दिसते.


''गार्निशिंग केवळ अन्नाचं नसतं, ते आयुष्याचंही असतं!''

स्टार्ट विथ द एंड इन माईंड हे फक्त व्यवस्थापनशास्त्रातलं तत्त्वज्ञान नाही, तर आयुष्य जगण्याची शैली आहे. आपण रोज जे करत आहोत, त्याचा शेवट काय असेल ? आपली वृत्ती, सवयी, विचार हे आपल्याला कुठे घेऊन जात आहेत? जसं ती गृहिणी शेवटच्या थेंबातही सौंदर्य शोधते, तसंच आपणही आपल्या आयुष्याच्या शेवटात आनंदाचा, कृतार्थतेचा आणि सौंदर्याचा गंध ठेवायला हवा. म्हणूनच, जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर आपण विचार केला पाहिजे ''हा दिवस मला कसा संपवायचा आहे ?''

मला माझं तारुण्य नुसतंच धावपळीत घालवायचं आहे का? माझं प्रौढत्व केवळ जबाबदाऱ्यांमध्ये गढून राहणार आहे का? की या सगळ्याच्या पलीकडे, एका शांत सुंदर शेवटाकडे मला जायचं आहे ?

पुलं म्हणतात ''माझ्या जीवनाच्या शेवटी जर मी एकाच गोष्टीबद्दल खात्रीपूर्वक सांगू शकलो, तर ती ही की मी मनसोक्त जगलो तर त्यासारखी दुसरी आनंदाची गोष्ट नाही.''

**(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## मुक्तिचतुष्ट्य


ज्योतिर्मय साहित्य

१)विष्णु शिखराचे नाव वैकुंठ आहे

२)ब्रम्हदेवाच्या शिखराचे नाव सत्यलोक आहे

३)अमरावती नावाचे इंद्राचेस्थान सत्यलोकाच्या खाली आहे. तेथे गण,गंधर्व, लोकपाल,असे सगळे तेहतीस कोटी देव रहातात. सप्तस्वर्ग, सप्तपाताल, कामधेनुचे मोठमोठे कळप, कल्पवृक्षांचे जंगल, जागोजागी अमर अशी सुमधूर जलाशये आहेत. नवरत्नांच्या खाणी आहेत. चिंतामणी रत्ने, हिरे, पाचू माणिकमोती सोने अशा नवरत्नांच्या पाषाणशिला आहेत. दिव्य सुवास असलेली फुले ओषधी वनस्पती आहेत . तेथील देह दिव्य व प्रकाशमान असतात. तिथे तारूण्य कधीच कमी होत नाही. कुणाला रोग, व्याधी होत नाही म्हातारपण व मरण येत नाही. यालाच स्वर्गभुवन असे नाव आहे. या ठिकाणी पण समर्थानी सलोकता,समीपता, सरूपता या तिन्ही चे महत्त्व सांगितले आहे. मंडळी पून्हा मी हरिपाठा कडे वळते मुखात श्रीहरी चं नाव असु द्या तर तुम्हाला पण स्वर्ग लोकात रहाण्याचं भाग्य मिळेल. पण एक लक्षात ठेवा जो पर्यंत तुमचे पुण्यसंचय असेल तो पर्यन्तच तिथे रहाण्याची परवानगी आहे। एकदा का पुण्यसंचय संपला की स्वर्गभुवनातुन खाली यावे लागते. मित्रांनो म्हणून म्हणते की एकदाच मनुष्य जन्म मिळाला आहे तेव्हा भरभरून पुण्यसंचय करा. विकारयुक्त मन, विषारी विषय हे कायमचे काढून टाका. संयमाने संस्कृती जपत ज्ञानविज्ञानाची कास धरत संस्कृती जपत जीवन जगा. सायुज्यमुक्ति शाश्वत आहे. सगुण व निर्गुण भक्तित समर्थानी निर्गुण भक्तिला परमश्रेष्ठ स्थान दिले आहे. सगुण भक्तित खोट्या भ्रमाचा लवलेशही नको. शाश्वत भक्ति करा. काय भुललासी वरलीया रंगाअशी पोकळ भक्ति नको. भक्त सम्राट श्री तुकाराम महाराजांच्या शब्दात, ''अद्वैती तों नाही माझे समाधान।विठ्ठलाच्या चरणाशी सेवा घडो''। तुझीया चरणाचे दास होण्याचे भाग्य मज मिळो''। श्री राम जय राम जय जय राम जय जय रघुवीर समर्थ. दशक चौथा समाप्त **(क्रमशः)**

## भगवंतावर अकारण प्रेम करावे.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

खरोखर, जगात आणि लौकिकात आपण अडाणी राहिलो तर काही वाईट नाही. भगवंताच्या मार्गामध्ये त्याचा फायदाच होईल. आपण अडाणी झाल्याशिवाय, म्हणजे आपली विद्या आणि मोठेपण विसरल्याशिवाय, परमार्थ साधत नाही. मुलगा गावाला जाताना ज्याप्रमाणे आई त्याला फराळाचे देते, त्याप्रमाणे परमात्मा आपल्याला ज्या परिस्थितीत जन्माला घालतो त्या परिस्थितीत राहण्यासाठी लागणारे समाधानही तो आपल्याला देत असतो. ते घ्यायची आपली लायकी मात्र पाहिजे. जिथे असमाधान फार, तिथे दुष्ट शक्तींना काम करायला वाव मिळतो. याच्या उलट, जिथे खरे समाधान आहे, तिथे चांगल्या शक्ती मदत करतात. आपण नामाला चिकटून राहिलो तर बाहेरची वाईट परिस्थिती बाधणार नाही. देहाचा मनाशी संबंध आहे, आणि मनाचा ह्रदयाशी संबंध आहे; म्हणून मन नेहमी अगदी समाधानात ठेवावे, म्हणजे प्रकृती चांगली राहून आयुष्य वाढेल.

स्वार्थ सुटताना पहिल्या-पहिल्याने मनुष्य व्यवहाराच्या चौकटीत बसणार नाही. जो येईल त्याला तो आपलाच म्हणेल. पण परमार्थ मुरला की तो व्यवहार बरोबर करून शिवाय नि:स्वार्थी राहील. खरोखर, परमार्थ हे एक शास्त्र आहे; त्यामध्ये सुसूत्रपणा आहे. व्यवहार न सोडावा; पण विषयाकडे गुंतणारी आपली वृत्ती भगवंताच्या आड येते, म्हणून तिला भगवंताकडे गुंतवावे. भगवंताची खरी आवड उत्पन्न झाली पाहिजे. भगवंतावर अकारण प्रेम करणे याचे नाव परमार्थ. परमार्थाला डोके शांत पाहिजे. एका गृहस्थाला सगळीकडे रामाची मूर्ती दिसू लागली. झाले ! त्याला वाटले की देव आपल्याला भेटला. पण हे काही खरे भगवंताचे दर्शन नव्हे. तो सर्व ठिकाणी आहे अशी भावना झाली पाहिजे. परमार्थाची काळजी करू नये; ती काळजीच प्रगतीच्या आड येते. वय वाढू लागले की आपले सर्व अवयव जसे प्रमाणात आपोआप वाढतात, तसेच परमार्थाला लागणाऱ्या गुणांचे आहे. आपण साधन करीत असताना, आपली प्रगती किती झाली हे सारखे पाहू नये. समजा, आपण आपल्या परसात एक झाड लावले, आणि ते किती वाढले हे पाहण्यासाठी रोज त्याच्या मुळ्या उपटून आपण जर पाहू लागलो, तर ते झाड वाढेल का ? अगदी तसेच परमार्थाच्या प्रगतीचे आहे. मनुष्याला परमार्थ किती साधला हे त्याच्या बोलण्यावरून आणि दृष्टीवरून ओळखता येते.

परमार्थ हा लोकांना उपदेश करण्यासाठी नाही. तो निव्वळ स्वतःकरिता आहे.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

यात अभाव कोणत्या गोष्टीचा आहे तर यात स्वनियंत्रित मार्गदर्शन करणारी, स्वतःहून क्रिया करणारी, शरीरात योग्य ते आसने, प्राणायामाच्या क्रिया करून घेणारी, जगत् जननी भगवती, कुंडलिनी माता, हिलाच गायत्री किंवा पार्वती माता असेही संबोधतात, या देवात्मशक्तीचे उन्नयन श्री गुरूच्याद्वारे केल्या गेलेले नसते. हा अभाव असल्यामुळे अशा साधकांना अभावयोगी म्हणतात. शारीरिक आरोग्याच्या बाबतीत असे अभाव योगी निश्चित स्वरूपात सफलता मिळवू शकतात, पण अध्यात्मिक उत्कर्ष परमोच्च बिंदूपर्यंत यातून शक्य होत नाही. असे माऊली ही म्हणतात.

अभावयोगात त्राटका द्वारे मनाची एकाग्रता करण्याचा प्रयत्न केला जातो. अग्नीवर किंवा काळ्या पाषाणावर त्राटक लावले जाते.

पंढरपूरचा पांडुरंग हा काळ्या पाषाणाचा आहे. ध्यान लावण्यासाठी काळा रंग हा सर्वोत्तम असतो. काळ्या पाषाणातील मूर्ती याचसाठी मुद्दामहून बनवतात. हा मोहक असा दिसणारा पांडुरंग ध्यान लावण्यासाठी सर्वश्रेष्ठ आहे, असे आपण सुंदर ते ध्यान उभे विटेवरी कर कटेवरी ठेवूनीया या गीतातून हे जाणतो. मोहक लोभस दिसणारा पांडुरंग त्यावर त्राटक करायला सर्वोत्तम आहे. ध्यान लावण्यासाठी सर्वोत्तम आहे. त्यावर त्राटक करावे यासाठीच तो काळ्या पाषाणात मुद्दाम मंदिरात स्थापित केला आहे.

अभावयोगी अशा त्राटकाद्वारे मन एकाग्र करून, अंतर्मनात शिरतात व अंतर्मन हे महामनाशी म्हणजेच परमात्म्याशी जोडलेले असल्याकारणाने चैतन्याचा अनुभव घेऊ शकतात. असे झाले की, पंढरपूरच्या पांडुरंगाच्या चरणातून दिव्य तेजोमय प्रकाश किरण उत्सर्जीत होताना साधक अनुभव घेऊ शकतो.

अभावयोगी म्हणजे कोण? हे आपण आत्ता पाहिले. आता योगी म्हणजे कोण हे पाहू. आपल्या सनातन धर्मात केवळ परमात्म्याचे दर्शनच नव्हे तर नराचा नारायण होईपर्यंत साधना करण्यासाठी दैवी शक्ती संपन्न सद्गुरु चे महत्व अनन्यसाधारण आहे. असे सद्गुरु संकल्पाने, स्पर्शाने, मंत्राने, फोन द्वारे इच्छुक व्यक्ती च्या अंतरंगात स्वतःची दिव्य तेजस्वी चैतन्य शक्ती चे पतन घडवतात व शक्ती संक्रांत पद्धतीने साधकाच्या मुलाधारा स्थित निद्रिस्त दैवी शक्तीस हलकेसे जागृत करतात. ही निद्रिस्त दैवी शक्ती म्हणजेच भगवती दुर्गा, पार्वती, सावित्री गायत्री अशा अनेक नावांनी संबोधल्या जाते. ही दिव्य शक्ती सद्गुरूंच्या दिव्य चेतन शक्ती द्वारा हलकीच जागी होते. ही प्रत्येक व्यक्तीच्या गुदद्वारा समीप मुलाधारा पाशी गोलाकार पहुडलेली असते. हिच्या गोलाकार अवस्थेत पहुडण्यावरून हिला (कुंडल मारले म्हणून) कुंडलिनी असे तांत्रिक नाम दिल्या गेलेले आहे.

समाजात सद्यस्थितीत या कुंडलिनी नावावरून अनेक अपसमज गुढत्व व भीती सुद्धा प्रसूत झालेली आहे. काही वेळेस अभावयोगी या निद्रिस्त भगवती जगदंबेस बाल पूर्वक जागे करण्याचा प्रयत्नही करतात. पण जसे निद्रिस्त बालकास आपण अचानकपणे चापटी मारून उठविले तर ते जसे चवताळते तसे नको तितक्या प्रमाणात जर ही कुंडलिनी माता जागृत झाली तर ती चवताळते. म्हणून अभावग्रस्त लोकांना अशा वेळेस या मातेकडून अपाय होण्याची शक्यता नेहमीच असते.

या उलट सद्गुरु द्वारा या विश्व मोहिनी जगदंबेस हलकेच जागविल्या जाते(उदे इ अंबे उदे हे अंबे तुझा उदय होवो). साधकाच्या पात्रते प्रमाणे, आरोग्य, वय हे पाहून तिला जागवण्याचे प्रमाण सद्गुरु ठरवितात. यानंतर ही जगदंबा स्वतःहून सुरुवातीस शरीरातील दोष कमी करण्यासाठी, आहे ते रोग नष्ट करण्यासाठी, किंवा संभाव्य रोग येऊ नयेत म्हणून साधका कडून विविध क्रिया करून घेते. साधक जेव्हा साधना रत होऊन, केवळ सुखासनात डोळे मिटवून बसतो, व केवळ या जगत् जननीचे कार्य कौतुकाने पाहतो, तेव्हा त्याच्या करवी आपोआप काही आसने काही क्रिया ह्या व्हायला लागतात.

**(क्रमशः)**

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं मे दृष्टिविषयो भव।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं मे वाणीविषयो भव।। ४८ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या दृष्टीचा विषय हो. जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या वाणीचा विषय हो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रीगुरुणाभिपूजिते।**
**सुराराध्ये कुलाराध्ये समर्चिते नमो नमः।। ४९ ।।**

हे श्रीगुरुंनी अभिपूजित जगदंबिके, तुला नमस्कार असो. देवांची आराध्य, कुलाची आराध्य,समर्चिते अशा तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रव्या कथा मया तव।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं कथ्या कथा मया तव।। ५० ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुझी कथा मी ऐकावी. श्रीरेणुके, तुला नमस्कार असो. तुझी कथा मी सांगावी.

**जगदम्ब नमस्तुभ्यं कुलरक्षणहेतवे।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं नित्यमुत्कर्षहेतवे।। ५१ ।।**

कुलाच्या रक्षणासाठीजगदंबिके, तुला नमस्कार असो. नित्यउत्कर्षासाठी श्रीरेणुके, तुला नमस्कार असो.




## निरोगी दृष्टिकोन राखणे

ज्योतिर्मय साहित्य

आजकालच्या महिलांचे जीवन व्यस्त आणि आव्हानात्मक आहे. काम, कुटुंब आणि इतर बाबींमुळे तुम्हाला वेगवेगळ्या दिशेने ओढले जाऊ शकते आणि ताण येऊ शकतो, ज्यामुळे स्वतःसाठी फारसा वेळ उरत नाही. स्वतःसाठी थोडा वेळ घेऊन तुमचे जीवन संतुलित करायला शिकल्याने मोठे फायदे होतील -

निरोगी दृष्टिकोन आणि चांगले आरोग्य.

तुम्ही घेऊ शकता अशी पावले:

कुटुंब आणि मित्रांच्या संपर्कात रहा.

तुमच्या समुदायात सहभागी व्हा.

सकारात्मक दृष्टिकोन ठेवा आणि तुम्हाला आनंद देणाऱ्या गोष्टी करा.

तुमची उत्सुकता जिवंत ठेवा. आयुष्यभर शिकणे तुमच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

निरोगी जवळीक सर्व रूपात असते परंतु ती नेहमीच जबरदस्तीपासून मुक्त असते.

तुमच्या आयुष्यातील ताण ओळखायला आणि त्याचे व्यवस्थापन करायला शिका. झोप न लागणे, वारंवार डोकेदुखी आणि पोटाच्या समस्या; खूप रागावणे; आणि ताण कमी करण्यासाठी अन्न, औषधे आणि अल्कोहोलचा वापर करणे ही ताणतणावाची लक्षणे आहेत.



संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

ताणतणावाचा सामना करण्याचे चांगले मार्ग म्हणजे नियमित व्यायाम, निरोगी खाण्याच्या सवयी आणि खोल श्वास घेणे किंवा ध्यान करणे यासारखे विश्रांतीचे व्यायाम. विश्वासू कुटुंबातील सदस्यांशी आणि मित्रांशी बोलणे खूप मदत करू शकते. काही महिलांना असे आढळते की तणावाच्या वेळी त्यांच्या धार्मिक समुदायाशी संवाद साधणे उपयुक्त ठरते.

पुरेशी झोप आणि विश्रांती घ्या. प्रौढांना रात्री सुमारे आठ तासांची झोप आवश्यक असते.

***

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य


काल आपण अरण्यकांड मध्ये प्रवेश केला आहे.



सामान्याप्रमाणे राहून जीवन उत्तम रीतीने कसे व्यतीत करावे हे आपण प्रभू राम यांचेकडे पाहून शिकू शकतो. त्यांनी अनेक ऋषींच्या आश्रमाला भेटी दिल्या. कुठे वास्तव्य केले आहे, कुठे केवळ नमस्कार आहे, कुठे चर्चा आहे. सर्व ऋषीचे आशीर्वाद त्यांना हवे होते.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

ऋषींची तपश्चर्या प्रभू साठीच आहे. सगळे तप करणारे ऋषी यांना परब्रम्ह प्राप्ती झालेली होती, तरी प्रभू चे सगुण रूप दर्शन त्यांनाही हवे होते. मानवी जीवनाची धन्यता ही जरी संत संगतीत होत असते. तशी प्रभूच्या मनातही ज्यांच्या संगतीचा इच्छा असते ते संत होत. वैकुंठ सोडून परमात्मा संत संगतीत राहतो. संत संगती माणसासाठी काय करते? या पेक्षा काय करीत नाही ? हा प्रश्न आहे. भर्तृहरी म्हणतात संत संगती आपल्या बुद्धीचे जडत्व हरण करते. बुद्धी धारदार बनवावी लागते त्यावर संस्कार करावे लागतात.बुद्धीचा मळकट पण धुतला हे काम संत करतात. परमात्मा अत्यंत सूक्ष्म आहे. तो सर्वांना कळत नाही अशा सूक्ष्म तेचे ग्रहण करण्याचे काम करावे लागते. संत बुद्धीला मंद राहू देत नाही, बुद्धीचे जडत्व जाते. एखादा सिद्धांत कळण्यास एरवी जेवढा वेळ लागतो त्या पेक्षा लवकर कळणे हे संत संगतीत होते. सूक्ष्म पदार्थाचे ग्रहण करणे शक्य होते. आमच्या वाणीवर संत संगतीमुळे सत्याची पखरण होते. असत्य मुखातून बाहेर पडण्याची शक्यता रहात नाही. कारण आपण संताचे संगतीत असतो, यामुळे बुद्धी शुद्ध झालेली असते.

**(क्रमशः)**



विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

### मानवतावादी धर्माचा साक्षात्कार

असंख्यांना एका सूत्रात बांधून
ज्या विश्वात तू आहेस
माझी अन तुझी ही
तिथेच युती आहे
न वनात न विजनात
न माझ्या मनात
जिथे तुझी माया जडे
तिथेच माझेही प्रेम जडे. ( गीतांजली )

मंदिर मशिदीत देवाला शोधण्यापेक्षा माणसातच त्याचा शोध घ्यायला हवा असे ते म्हणतात. मानवाला भेटा, त्याच्या कष्टात, घाम गाळण्यात सहभागी व्हा. धार्मिक माणसाने कष्ट आणि परिश्रम यांच्या माध्यमातूनच ईश्वराला भेटले पाहिजे. सामान्य माणूसच प्रेम आणि सेवा यांचा केंद्रबिंदू ठरला पाहिजे. कारण त्या मार्गेच ईश्वराची कृपा संपादन करता येते. त्यामुळेच ईश्वराचे निकटतम रूप आपल्यासमोर साकार होते. अशा तऱ्हेने रवींद्रनाथांचा मानवतावाद व्यक्त झालेला आपल्याला दिसतो. त्यांच्या दृष्टीने ईश्वर हा प्रामुख्याने अशिक्षित, दरिद्री समाजामध्ये वसलेला आहे. मजूर रस्ते करण्यात मग्न आहेत तर शेतकरी धान्य पिकवण्यात. हे सगळे लोक निढळाचा घाम गाळतात. ईश्वर सर्वांमध्ये आहेच पण केवळ सुस्थितीत असलेल्या लोकांकडेच ईश्वराचे रूप म्हणून बघू नये तर असे दरिद्री कष्टकरी लोक हे ईश्वराचे रूप आहेत. आपल्या एका कवितेत ते म्हणतात...

जिथे तो जाई तिथे तो पाही
भूमी नांगरून चाललेली शेतीभाती
दगड फोडून रस्ते करती
बारोमास देह कष्टविती
तो आहेच उन्हात पावसात सुद्धा
धुळीने माखलेला फाटका कुडता पाहून
शुभ्र वसने द्या टाकून नि बसा
त्याप्रमाणे ह्या संगे धुळीत. ( गीतांजली - इंग्रजी आवृत्ती )

कोणतेही काम केवळ व्यक्ती हितास्तव करू नये. ते समाजाच्या व्यापक कल्याणासाठी असावे. ईश्वराचा सेवक हा सर्वसंचारी कार्यकर्ता बनला पाहिजे. कामे कितीही छोटी असो, ती सर्वव्यापी समजूनच करावी. अशा कामाने विश्वकर्म्याचा साक्षात्कार होतो. विश्वकर्मा म्हणजे जो सर्वांसाठी काम करतो, जो संपूर्ण विश्वासाठीच जणू काम करतो असा ! (रिलीजन ऑफ मॅन)

ईश्वराची सेवा करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे मानवाची सेवा करणे. यामध्ये गोरगरीब, अशिक्षित आणि दरिद्री लोकांची सेवा प्रामुख्याने येते. रवींद्रनाथांचा हा मानवतावाद धर्मावर आधारलेला आहे. पाश्चिमात्य विचारवंत सुद्धा मानवतावादाची कल्पना मान्य करतात परंतु त्यांच्या विचारात धर्माला स्थान नाही तर रवींद्रनाथांचा मानवतावाद हा धर्मावर आधारित आहे. मानवता हाच त्यांच्या दृष्टीने सर्वात मोठा धर्म आहे. ईश्वरावरील डोळस श्रद्धा आणि धर्मभावनेतून त्यांचा मानवतावाद निर्माण झाला आहे. हाच मानवतावादाचा उदात्त दृष्टिकोन बाळगून रवींद्रनाथांनी आयुष्यभर मानवतेची सेवा केली. त्यांचे साहित्य, त्यांच्या शिक्षणविषयक कल्पना, त्यांचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्य या साऱ्या गोष्टींचा केंद्रबिंदू मानवच राहिला.

(क्रमशः)

ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# स्त्रीवादाचे विलोभनीय रूप मांडणाऱ्या - कवयित्री पद्मा गोळे

ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)

सीतेपुढे एकच ओढली रेषा लक्ष्मणाने, तिने ती ओलांडली आणि झाले रामायण.

आमच्यापुढे दाही दिशा लक्ष्मण रेषा- ओलांडाव्याच लागतात. रावणांना सामोरे जावेच लागते.

एवढेच कमी असते, कुशीत घेत नाही भुई दुभंगून!‘‘


निहार या काव्यसंग्रहातील लक्ष्मण रेषा ही एक प्रसिद्ध कविता. आधुनिक काळातील अर्थार्जना साठी बाहेर पडलेल्या स्त्रीची होणारी घुसमट, कोंडी आणि तिच्या वेदना या कवितेतून व्यक्त होतात. आयुष्यातील कडू गोड अनुभव, बालपणीच्या आठवणी, काही रित्या पण बऱ्याचश्या भरलेल्या ओंजळी आणि जे साध्य केले त्यातील समाधान मानून पुढे चालत राहण्याची एक सुंदर अभिव्यक्ती म्हणजेच चाफ्याच्या झाडा ही कविता. त्यांनी चाफ्याच्या झाडाशी साधलेला अत्यंत भावोत्कट असा हा संवाद. स्वतःच्या जगण्याविषयीची खंत, रितेपण, अपूर्णता याविषयी स्त्रीचं मूकपणे व्यक्त होणं असतं ते निसर्गाजवळ झाडापानां जवळ फ ुलांजवळ. त्या म्हणतात,

‘‘चाफ्याच्या झाडा चाफ्याच्या झाडा, पानात मनात खूपतय ना ?
हसून सजवायचं ठरलंय ना..
कुठं नाही बोलायचं, मनातच ठेवायचं .
फुलांनी ओंजळ भरलीये ना!‘‘

किती सुंदर अद्वैत साधले आहे या रचनेत. त्या म्हणतात, ‘‘मी स्त्री म्हणून लिहीत नाही मी माणूस म्हणून लिहिते पण माझं स्त्रीत्व माझ्या प्रत्येक ओळीत आहे.‘‘

आपल्या निस्वार्थ प्रेमानं घरासह सर्वांना आपलंसं करणारी स्त्री कर्तव्य पार पाडत राहते पण ओंजळीत फारसं काही गवसत नाही अखेर काहीशी निराश होऊन आत्मशोधाच्या वाटेवर स्थिरावून ठाम निश्चय करताना दिसते .आधुनिक युगातल्या आजच्या स्त्रीने पद्मताईंचा हा अट्टाहास ओळखून सतर्क व्हावं असंच वाटतं .त्यांची मी आत, घरात आले ही कविता त्यासाठी किती बोलकी आहे.






‘‘मी आत घरात आले.दोन डोळ्यातली ज्योत झाले.‘‘ कवितेच्या अखेरीस त्या म्हणतात,

‘‘आता सोंगे पुरे झाली, सारी ओझी जड झाली .
उतरून ठेवून आता तरी, माझी मला शोधू दे.!‘‘

त्यांची अशीच एक अर्थगर्भ कविता म्हणजे आताशा मी नसतेच इथे. स्वतःचं सध्याचं अस्तित्व आणि मन यांची सांगड घालत ती बाहेरच्या आठवणीत रममाण होते. मनानं माहेरात रमलेली स्त्री या कवितेत म्हणते,

‘‘आताशा मी नसतेच इथे .
तशी अजून माझी जा-ये नसली तरी, आताशा मी नसतेच इथे.!‘‘

पद्मताई म्हणतात, कविता ही स्त्री सारखीच असते. स्वतः ला सिद्ध करायचं नसतं पण समजून घ्यायचं असतं. त्यांच्या कवितेतून मी कोण ? याचं भान स्त्रीला येतं. त्यांची आठवणी ही अशीच एक सुंदर कविता. ‘‘ मनात आठवणी गर्दी करतात तेव्हा,
हसत मुखाने त्यांना या म्हणावं.‘‘

या कवितेत शेवटी त्या म्हणतात,
‘‘ पण कोणाला काहीच देऊ नये .
शब्द तर मुळीच देऊ नयेत.!‘‘

शब्दांवर अमाप प्रेम करणारी अशी ही कवयित्री.




काव्यात भावनांची खोली कायम ठेवल्याने वाचक त्यांच्या कवितांशी सहज जोडला जातो. संसाराचा तोल सावरत माणूसपण जपणारी अशी ही कवयित्री. नव्या युगातील स्त्रीचा आदर्श समोर ठेवणं, समाजवादाचा प्रांजळपणे पुरस्कार करणं ही त्यांच्या कवितांची वैशिष्ट्य. जन्मतः घरंदाजपणा लाभल्याने वागण्यात एक प्रकारची शालिनीता, नेटकेपणा पण प्रसंगी बेडर आणि बंडखोर वृत्तीचही बाळकडू लाभलेल्या पद्मताईंनी काव्य लेखनात पण बंडखोरी दाखवली आहे ,पण तीही मर्यादांचे उल्लंघन न करता. शालिनता हे त्यांच्या लेखनाची खास वैशिष्ट्ये. पद्मताई म्हणतात,‘‘मौन म्हणजे मूक नव्हे, तो शब्दाच्या पल्याडचा संवाद असतो.‘‘पण वेळप्रसंगी शब्दांच्याच गुंत्यात अडकून तटस्थपणे त्याचा शोध घेताना दिसतात. मग शब्दांची असंख्य बरी वाईट रूपं त्यांच्याभोवती फेर धरतात. शब्दातली सत्यासत्यता त्या पडताळून पाहतात. पाठीशी कृष्ण हवा या कवितेत त्या म्हणतात,

‘‘मौनान होतं एवढं रामायण हे माहीत असतं तर ..
शब्दांच्या स्वाधीन झाले असते.

या कवितेत शेवटी त्या म्हणतात,
‘‘मौनाचं रामायण सहन करता येतं सीता होऊन.
पण शब्दांचं महाभारत सोसायला पाठीशी कृष्ण हवा.!,‘‘

मौनाची शक्ती आणि शब्दांचं सामर्थ्य कवयित्रीने रामायण, महाभारताचा दाखला देऊन अतिशय परखडपणे मांडले आहे. कवितेला एक गूढ अर्थ नक्कीच आहे पण तो गुंता अखेर त्यांनी हळुवारपणे सोडवलाय. मौनातून घडलेलं रामायण आणि अहंकारातून घडलेलं महाभारत यात मौनाचं रामायण मी सहन करू शकते पण त्यासाठी पाठीशी कृष्ण हवा असं त्या सांगतात. शब्दांच्या जहरी वारांमुळे घायाळ झालेली कवयित्री अखेर सगळ्यातून तरुन जाण्यासाठी कृष्णाचाच धावा करते. पद्मताईंचा सुखदुःखाकडे पाहण्याचा दृष्टिकोन मुळातच वेगळा आहे. दुःखाचे स्वागत करताना त्या म्हणतात,

‘‘वामनाच्या पावलांनी माझे दुःख आले घरा,
घाला सौभाग्याचे हेळ, सोनकेळ लावा दारा..‘‘

निराशेत ही रम्य औदास्य पाहणारी कवयित्रीची दृष्टी अनोखी अशीच आहे.

साधी, सोपी, तरल भाषा, भावनांची खोली, प्रेमविषयक गाढ जाणिवा, सौंदर्यदृष्टी, निसर्ग प्रेम, भावनांचे प्रकटीकरण, भावोत्कटता हे सगळं त्यांच्या लेखनात उस्फूर्तपणे आल्याने त्यांच्या कविता वाचकांच्या मनाला भिडतात आणि भावनांना आवाहन करतात.

***

# जुगाड........

ज्योतिर्मय साहित्य

जगात झालेल्या चार क्रांत्या त्यातील अमेरिकन राज्यक्रांती, फ्रेंच राज्यक्रांती, आणि रशियन राज्यक्रांती, या क्रांतींनी, राजकीय, आर्थिक, सामाजिक, जागतिक राजकारण, आणि भूगोलामध्ये बरेच बदल घडवून आणले. आपण फ्रेंच राज्यक्रांती ही खूप महत्त्वाची मानतो कारण या क्रांतीने मानवाला स्वातंत्र्य, समता, बंधुता, ही तत्वे दिली. अनेक देश स्वतंत्र झाले. तशीच आणखीन एक क्रांती झाली ती म्हणजे औद्योगिक क्रांती.ह्या क्रांतीने संपूर्ण जगाच्या चेहरामोहराच बदलवून टाकला.मानवाच्या जीवनाला गती प्राप्त झाली. ती गती होती विकासाची, प्रगतीची, नाविन्यतेची, त्यामुळे मानवाचे जीवन गतीमान झाले.औद्योगिक प्रगतीने विज्ञानाच्या साह्याने शोध लागले.संशोधकांच्या बुध्दीमत्तेला चालना मिळाली. या औद्योगिक क्रांतीचे परिणाम जसे चांगले झाले तसेच वाईट ही झाले. एवढ लिहायचं कारण म्हणजे जे औद्योगिक क्रांतीने औद्योगिकीकरण घडून आले आणि त्याला कारणीभूत असणारे बुध्दीमान वैज्ञानिक, संशोधक, कुशल कारागीर यांनी जो हातभार लावला तसाच आज काही प्रमाणात छोटे संशोधक किंवा कारागीर लावताना पहायला मिळत आहेत.

काल परवा यूट्यूब रिल्सवर काही लोकांनी केलेले जुगाड पहायला मिळाले. शेती विषयक, वाहन विषयक, वगैरे रिल्स पहायला मिळतात. परवा एका कामगार स्त्री ने निळा रसायनाचा बॅरल जो असतो त्याच्या टोपणाच्या मदतीने खोर्या तयार केला. बॅरल मधून रसायन बाहेर काढण्यासाठी जे छिद्र असते त्याच्या सभोवतालचा भाग अर्धा कापून त्या छिद्रात दांडा बसवून खोर्या सारखा आकार दिला आणि शेण कचरा ओलसर कचरा गोळा करण्यासाठी वापर केला. अगदी हुबेहूब खोर्या तिने तयार केला.खुरपणी,कोळपणी करणे, या सारख्या कामासाठी कित्येक लोक वेगवेगळे जुगाड तयार करीत आहेत. शेंगा फोडण्याचा चिमटा, मकेची कणसे सोलण्याचे हात खिसणी, फळे कापून काढण्यासाठी यंत्र,आंबा काढण्यासाठीचा जुगाड असाच पाहिला आणि घरच्या झाडाचे आंबे व्यवस्थित उतरून घेता आले.साधाच पण परिणामकारक जुगाड होता. शितपेयाची दोन लिटरची बॉटल त्याला चौकोनी कट करून तोंडाच्या विरुद्ध बाजूला त्रिकोणी छेद घेऊन बाटलीच्या तोंडात मोठी काठी फिट करुन बरोबर आंबे काढता आले. म्हणजे जुगाड करणारी मंडळी उगाच काही तरी रिल्स बनवायचे म्हणून काही तरी टाकून मोकळे होत नाहीत, हे मी पाहून केलेल्या जुगाडावरून सिध्द झाले. गरज ही शोधाची जननी आहे. असे म्हणतात ते खरेच आहे. वेगवेगळ्या गरजेतून ही मंडळी हे जुगाड बनवित आहेत. शेतात बिया पेरणी पासून ते काढे पर्यंत सर्व प्रकारच्या गरजेला पडणारी व टाकावूतून टिकाऊ असे जुगाड निर्माण करण्याची मानसिकता, बुध्दीमत्ता, कुशलता,या सामान्य माणसात पहायला मिळते आहे. ती जशी औद्योगिक क्रांती होती तशीच ही नव्याने होत असलेली जुगाड क्रांतीच आहे. असे वाटते.खरच निर्मिकांच्या कुशलतेला सलाम, त्यांच्या नवनिर्मितीच्या ध्यास व प्रयत्नांना सलाम,त्यांच्या हस्तकौशल्यास सलाम,त्यांच्या बुध्दीचातुर्यास सलाम. सलाम सलाम सलाम...!!!


दत्ता तरलगट्टी
मुक्त पत्रकार, पंढरपूर

अनेक जुगाड पाहिल्या नंतर त्यांच्या जुगाड प्रयत्नाला दाद देण्यासाठी हा लेख प्रपंच!!काय सर तुम्हाला कोणताही विषय मिळाला की लिहिता असं समजू नका.या लोकांच्या कलेला प्रसिध्दीला आणणं महत्त्वाचं वाटलं म्हणून.....!!!

# ‘‘सन ऑफ सरदार २‘‘ चा धमाकेदार ट्रेलर रिलीज

ज्योतिर्मय साहित्य

बॉलीवूडचा ॲक्शन किंग अजय देवगण पुन्हा एकदा आपल्या चाहत्यांसाठी ‘‘सन ऑफ सरदार २‘‘ घेऊन सज्ज झाला आहे. ट्रेलरच्या अनावरणाने चाहते अक्षरशः जल्लोषात बुडाले आहेत. पहला तू दूजा तू सारख्या हटके रोमँटिक टचसह आणि जबराट टायटल ट्रॅकसह ट्रेलरने जोश आणि मनोरंजनाची पर्वा उडवली आहे.

‘‘सन ऑफ सरदार‘‘च्या आठवणी जागवणाऱ्या या ट्रेलरची सुरुवात प्रेक्षकांना पुन्हा जस्सीच्या धमाल दुनियेत घेऊन जाते. हास्य, ड्रामा, ॲक्शन आणि देसी तडका या सगळ्याने परिपूर्ण असलेल्या ट्रेलरने यंदा मनोरंजनाचं परफेक्ट पॅकेज दिलं आहे.

जस्सीचं देसी स्वॅग पुन्हा एकदा दिसणार आहे, पण प्रश्न आहे, पंजाबमध्ये टिकलेला जस्सी स्कॉटलंडमध्येही तसाच धुमाकूळ घालेल का? चित्रपटाची दिग्दर्शनाची धुरा विजय कुमार अरोरा यांनी सांभाळली आहे.या चित्रपटात अजय देवगण, रवि किशन, संजय मिश्रा, मृणाल ठाकुर, नीरू बाजवा, चंकी पांडे, कुब्रा सैत, दीपक डोबरियाल, विंदू दारा सिंग, रोशनी वालिया, शरत सक्सेना, साहिल मेहता आणि दिवंगत मुकुल देव आदींची मांदियाळी आहे.




जशी पहिल्या भागात धमाल होती, तर यंदा ती धमाल दुप्पट होणार, यात तिळमात्र शंका नाही.‘‘सन ऑफ सरदार २‘‘ हा चित्रपट जिओ स्टुडिओज आणि देवगण फिल्म्स प्रस्तुत करत असून, देवगण फिल्म्स आणि एसओएस २ लिमिटेड निर्मित आहे.

अजय देवगण आणि ज्योती देशपांडे निर्माते असून, एन. आर. पचीसिया, प्रवीण तलरेजा सहनिर्माते आणि कुमार मंगत पाठक सह-निर्माते आहेत. ‘‘सन ऑफ सरदार २‘‘ हा चित्रपट २५ जुलै २०२५ रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. अतिशय धमाल उडवून देणारा हा ट्रेलर बघून रसिकप्रेक्षक आतुरतेने या सिनेमाची वाट बघत आहेत.



# श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**छत्रपती संभाजीनगर** – श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक), छत्रपती संभाजीनगर येथे गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शांडिल्य टेक्नोप्लास्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत सराफ उपस्थित होते. तसेच श्रीपाद कुलकर्णी (सहयोगी संयोजक, विज्ञान भारती), दीपक पाटील (शिक्षा संस्कृती उथन्यास), सुदर्शन धारूरकर (प्रोजेक्ट मॅनेजर, टाटा स्ट्राईव्ह), आणि मंगेश मोकळ (समन्वयक, टाटा स्ट्राईव्ह) हे मान्यवर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

प्राचार्य प्रा.एस.एस. खंडागळे यांनी आजच्या विद्यार्थ्यां समोरील आव्हानांवर भाष्य केले, तर प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. अनिल पालवे यांनी रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्यांनी ज्ञान अद्ययावत ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमात विविध शाखांतील २४ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अंतिम वर्षात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्यांमध्ये सोहम देशपांडे (संगणक - ९१.२९%), दर्शन समुद्रवार (ए.आय.एम.एल. - ८६.११%), भारती शिंदे (सिव्हिल - ८४.२७%), समीर पठाण (मेकॅनिकल - ८१.५४%), दिनेश राठोड (इलेक्ट्रिकल - ८०.५०%) आणि भावेश काटे (ईटीसी ईटीसी - ८०.११%) यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी यशाचे श्रेय शिक्षक व पालकांना दिले. कार्यक्रमास विभागप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दवाखाना

## क्षयरोग- भाग १

**ज्योतिर्मय साहित्य**

नमस्कार मैत्रांनो!

क्षय रोग म्हणजे ज्याने शरीराचा क्षय होतो तो रोग. हा शब्द वद्य पक्षातील चंद्राच्या दररोज होणाऱ्या क्षयावरून घेतला असावा. अंती अमावास्येच्या रात्री चंद्र संपूर्णपणे काळोखात नाहीसा होतो, तद्वतच कांही रुग्णांचे गलितगात्र शरीर आणि खचलेले मन या दोहोंचा या जगातून अस्त होतो. आयुर्वेदात या रोगाचे राजयक्ष्मा अर्थात रोगांचा राजा असे नामकरण केल्या गेले आहे. हिंदीत याच रोगाला 'तपेदिक' असे नांव आहे. दूषित हवामान आणि इतर कथित कारणांमुळे क्षयाचा प्रादुर्भाव होतो, या संकल्पना मोडीत काढत इ.स.१८८२ साली डॉ.रॉबर्ट कॉक यांनी क्षयरोगाच्या कारणीभूत असलेल्या जिवाणूंना परिचय दिला. त्यांनी हा प्रबंध जागतिक शास्त्रज्ञांच्या परिषदेत मांडला व त्यास दिनांक २४ मार्च रोजी मान्यता मिळाली. म्हणून दरवर्षी २४ मार्च हा दिवस 'जागतिक क्षयरोग दिन' म्हणून सर्वत्र साजरा केला जातो.

हाइनरिक हेर्मान रॉबर्ट कॉक (११ डिसेंबर, १८४३ – २७ मे, १९१०) हे जर्मनीचे आधुनिक जीवशास्त्राचे प्रणेते म्हणून ओळखल्या जातात. ते लहानपणापासूनच शैक्षणिकदृष्ट्या अतिशय प्रज्ञावान होते. त्यांनी विज्ञान आणि गणितामध्ये उत्कृष्ट कामगिरी करून माध्यमिक शाळेतून पदवी प्राप्त केली. वयाच्या १९ व्या वर्षी कॉक यांनी नैसर्गिक विज्ञानाचा अभ्यास करून गॅटिंगन विद्यापीठात १८६२ मध्ये प्रवेश घेतला. मात्र तीन सत्रानंतर कोच यांनी आपल्या अभ्यासाचे क्षेत्र बदलले. त्यांनी वैद्यकीय शिक्षण घ्यायला सुरुवात केली, कारण त्यांना डॉक्टर व्हायचे होते. तेथे त्यांच्यावर हेन्ले या प्राध्यापकाचा प्रभाव पडला. हेन्ले यांनी १८४० मध्ये परोपजीवी जंतूंमुळे रोग होतात, असा एक प्रबंध मांडला होता. त्यामुळे वैद्यकशास्त्राचं शिक्षण घेत असतांनाच 'संसर्गजन्य रोग' या विषयाबद्दल रॉबर्ट कॉक यांना विशेष आवड निर्माण झाली.



रॉबर्ट कॉक

१८६६ मध्ये कॉकने उच्च गुणवत्तेसह वैद्यकीय पदवी प्राप्त केली. त्यांनी क्षयरोग, कॉलरा आणि अँथ्रॅक्सच्या विशिष्ट कारक जिवाणूंची ओळख पटवली आणि संसर्गजन्य रोगाच्या संकल्पनेला आपल्या प्रयोगांची जोड दिली. यात मानव आणि प्राणी यांच्यावरील प्रयोगांचा समावेश होता. म्हणून त्यांना आधुनिक जिवाणूशास्त्राचे प्रथम अन्वेषक आणि संस्थापक म्हणून मान्यता मिळाली. कॉक यांनी जिवाणूशास्त्राच्या क्षेत्रात प्रयोगशाळा तंत्रज्ञान आणि तंत्रांची निर्मिती केली आणि त्यांत कैक सुधारणा केल्या. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने संसर्गजन्य रोगांचा प्रसार अतिशय महत्वाचा आहे, हा शोध त्यांचाच! याच संशोधनाचे फलित म्हणजे कॉक्स पॉस्च्युलाटेस (गृहीतके) यांची निर्मिती! विशिष्ट सूक्ष्मजीवांना (जिवाणूंना) विशिष्ट रोगांशी जोडणारी कॉक्स पॉस्च्युलाटेस ही चार सामान्यीकृत तत्त्वे ब्रॅडफोर्ड हिल द्वारा १९६२ मध्ये साथीच्या आजारांकरिता मांडलेल्या निकषांशी जुळत असल्याचे सिद्ध झाले. क्षयरोगावरील संशोधनासाठी कॉक यांना १९०५ मध्ये शरीर क्रिया शास्त्र/ काया चिकित्सा शास्त्र याचे नोबेल पारितोषिक मिळाले.



लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

संसर्गजन्य आजाराला मान्यता देणारी कॉकची महत्वपूर्ण गृहीतके थोडक्यात अशी आहेत.

*कथित विशिष्ट सूक्ष्म जीव त्या विशिष्ट रोगाच्या रुग्णात असायला हवेत, पण निरोगी माणसात नसावे.

*रोगग्रस्त व्यक्तीपासून सूक्ष्मजीव वेगळे करणे आणि त्यांची प्रयोगशाळेत वाढ करणे आवश्यक आहे.

*जेव्हा निरोगी व्यक्तीमध्ये या सूक्ष्मजीवांना प्रवेश दिल्या जाईल तेव्हा त्या निरोगी व्यक्तीत त्याच रोगाचा प्रादुर्भाव व्हायला हवा.

*या दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरातून हे सूक्ष्म जीव वेगळे काढता येऊन ते पहिल्या रोग्यातील सूक्ष्मजीवांसारखेच आहेत हे सिद्ध करता येणे आवश्यक आहे.

मंडळी, याच संदर्भात त्यांनी आफ्रिकेत बरेच मानवी-संशोधन केले होते. मात्र वैज्ञानिकांच्या एका समूहाने त्यांच्यावर आरोपही केले की त्यांचे आफ्रिकेतील गरीब व्यक्तींवर केलेले प्रयोग अमानवीय होते. अशा तऱ्हेने एकमेकांच्या संपर्कात येऊन संसर्ग होणाऱ्या रोगांना संसर्गजन्य रोग असे म्हणतात. हे रोग दूषित अन्न, पाणी, हवा किंवा थेट शारीरिक संपर्काद्वारे पसरतात. संसर्गजन्य रोग हे रोगजनक जीवशास्त्रीय घटकांच्या संसर्गामुळे होतात. हे घटक म्हणजे जिवाणू , विषाणू , बुरशी , आदिजीवसंघ किंवा परजीवी असू शकतात. कारक घटकांच्या संख्येनुसार संसर्गजन्य रोगांची व्याप्ती बहुदा सौम्य ते अतिगंभीर श्रेणीत वर्गिकृत केल्या जाते. यात कधीकधी मृत्य संभवतो. पुढील भागात चर्चेचा विषय क्षयरोगच !

# चटपटीत क्रीस्पी फुले



**ज्योतिर्मय साहित्य**

बऱ्याच मुलांना खाण्याचे अजिबात वेड नसते. खाण्यासाठी सतत मागे लागावे लागते त्यांच्या.अशावेळी जर त्यांचे लक्ष वेधून घेण्यासारखे आकर्षक असे काही ना काही बनवून त्यांना दिले तर नक्कीच ते आवडीने खातात. हा अनुभव कितीतरी आयांना येत असतोच. लांब कशाला,माझा मुलगा मंदारच्या

बाबतीतही हा अनुभव आला आहे. अगदी रोजच्या पोळीचे सुद्धा कधी , कधी त्रिकोण,चौकोन,स्टार तर कधी प्राणी,पक्षी यांचे आकार केले की साधी पोळी सुद्धा त्याच्या नादाने जायची पोटात. त्यामुळे असे सतत काहीतरी नवीन बनवावे लागतेच तेही टेस्टी!

आज आपण असाच एक पदार्थ बनवू . जो पाहून मुलेच काय, मोठ्यांना सुद्धा राहवणार नाही. उत्कंठा वाढली आहे ना? चला मग..

साहित्य:

अर्धी वाटी कणिक, अर्धी वाटी मैदा किंवा संपूर्ण कणिक वापरली तरी चालते, २ चमचे तांदुळाची पिठी किंवा कॉर्न फ्लोअर, खमंग करायचे असतील तर १ चमचा ओवा आणि पाव चमचा हिंग घालावा व चवीनुसार मीठ घालावे. आणि गोडाची फुले बनवायची असतील तर अगदी किंचीत चवीसाठी फक्त मिठ घालावे. २ चमचे गोड करताना तुपाचे मोहन घालावे ,तिखट, मिठाचे करताना तेलाचे मोहन घालावे, वरून भूरभुरण्यासाठी तिखट, चाट मसाला .




कृती:

प्रथम एका मोठ्या बाऊलमध्ये कणिक,मैदा, पिठी, मिठ, दोन्ही हातांवर चोळून ओवा,हिंग, तेलाचे एकदम कडकडीत मोहन घालावे.

नंतर लागेल तसे थोडे थोडे आणि घालत त्याचा घट्ट गोळा बनवून घ्यावा व तो १० मिनिटे घट्ट झाकून ठेवावा.

नंतर तो पुन्हा छान मळून घेऊन तेलाचा हात लावून त्याचे पोळी सारखे उंडे करून पातळ पोळी लाटून घ्यावी. आता या पोळीच्या चारी बाजू सुरीने कापून मधला चौकोनी भाग ठेवावा. आता त्याच्या साधारण दीड ते दोन पेरा एवढ्या लांबट पट्ट्या कापून घ्याव्यात. नंतर एकेक पट्टी घेऊन त्याची थोडी बाजू एकाबाजूने तशीच ठेवून बाकी पट्टीला शक्य तितक्या जवळ जवळ सुरीने कट द्यावेत.

सजावटीच्या झिरमीळ्या बनवतो त्याप्रमाणे बनवून त्याला गोल वेटोळे देऊन घट्ट रोल बनवावा म्हणजे खाली देठ आणि वरती पाकळ्या प्रमाणे दिसेल. हवे तर हिरवा खाण्याचा रंग देठाना लावावा. अशा प्रकारे सगळी फ ुले बनवून ठेवावीत.

नंतर गॅसवर कढई ठेवून फुले तळण्यासाठी त्यात तेल घालावे. तेल गरम झाले की ही फुले क्रीस्पी होईपर्यंत मस्त तळून घ्यावीत. मस्त केशरी,तांबूस रंगाची ही फुले चाळणीत काढून तेल निथळले की वरून आवडीनुसार तिखट, चाट मसाला भुरभुरून सर्व्हिंग डिशमध्ये काढून सर्व्ह करावीत. ही गरम पण छान लागतातच पण थंड झाल्यावर जास्त क्रीस्पी बनतात आणि मस्त कुरकुरीत चटपटीत लागतात.

वैशिष्ठ्य:ही फुले साधारण तिखटमीठाच्या शंकरपाळी सारखी लागतात. चाट मसाल्यामुळे जास्तच सुरेख लागतात. भरपूर दिवस टिकतात. गौरी..गणपतीला,चैत्रगौरीला पुढे फराळाचे पदार्थ ठेवतात तेंव्हा ही लक्षवेधून घेतात.

या प्रमाणेच बनवून साजूक तुपात तळून वरती पिठीसाखर,वेलची पुड भुरभूरावी किंवा साखरेचा किंचीत लिंबू पिळून , वेलची, केशर घालून दोनतारी पाक करून त्यात फक्त बुडवून काढून सुकवले तरी हि गोडाची फुले खूप सुंदर, लागतात.पाकाच्या चमकदारपणा मुळे खूपच आकर्षक दिसतात. पाहूनच खाण्याचा मोह आवरणार नाही आणि एकदा सुरुवात केली की मोह आवरणे कठीण होते.

## कवितेच्या लाटावर...



आतला पाऊस

खिडकीत बसून चहाचा आस्वाद घेत,
नव्वदच्या दशकातील रोमॅन्टिक गाणी ऐकत,
गरमागरम कांदा भजी खात खात,
खाली रस्त्यावर साचलेलं पाणी,
पाण्यातून वाट कढत जाणारी माणसं,
बंद पडलेल्या गाड्या, मुलांचं पाण्यात खेळणं,
टिव्हीवर सतत चालू असणाऱ्या पावसाच्या बातम्या
ही सगळी पावसाची मजा बाहेरची.
खिडकी बाहेरचा पाऊस तर आपण पहातोच.
पण, कधी खिडकीच्या आतला पाऊस पाहिला आहे?
खिडकी, मनाची. घट्ट मिटलेली.
पहा कधीतरी डोकावून खिडकीच्या आत.
ठेवा कोणाच्या तरी पाठीवर हात,
त्या स्पर्शातून सांगा काळजी करु नको, मी आहे.
डोळ्यात डोळे घालून पहा निरखून,
उतरा खाली मनाच्या गाभाऱ्यात,
उघडा ती खिडकी हलक्या हाताने.
होऊ देत काळे ढग बाजूला
दिसेल तुम्हालाही रिमझिम संततधार कदाचीत
मुसळधार सुध्दाअसू शकतो खिडकीच्या आतला पाऊस.

शेखर देशपांडे

## कवितेच्या लाटावर...

मी चित्त चोरल्याचे
वृत्त- आनंदकंद

मी चित्त चोरल्याचे सांगू नको जगाला
हृदयात कोंडल्याचे सांगू नको जगाला

साक्षात पौर्णिमेला उघडू प्रकाश दारे
मी दुःख झाकल्याचे सांगू नको जगाला


बुजल्या अनेक जखमा पण खूण बहरलेली
तू नाव गोंदल्याचे सांगू नको जगाला

शिरलो घरात जेव्हा,होतीस एकटी तू
चोरून भेटल्याचे सांगू नको जगाला

भेटावया तुला मी गावात काल गेलो
चौकात बांधल्याचे सांगू नको जगाला

तू बोलली जराशी,झाला नवा तमाशा
वर्गात झापल्याचे सांगू नको जगाला

मी ही तुझाच वेडा झालीस तू दिवानी
हा रोग जाहल्याचे सांगू नको जगाला




✍️®रज्जाक शेख
श्रीरामपूर,महाराष्ट्र 9665778558

## कवितेच्या लाटावर...

शब्द किंमत ..

देण्याआधी तो शब्द
जाणा त्याची किंमत
नंतर शब्द मोडायची
नको कुणाची हिंमत

आधीआपण व्हायचे
तद्विचारांशी सहमत
काफिला येई मागुति
होईलं मग सर्व संमत

सूर जमविणे कठिण
रे नाही कुणाचे दुमत
विश्वास ठेव अनामत
देतील अनंत अनुमत

इच्छा अतृप्त मनांत
भिन्न नसावे अभिमत
राखता महत्व सादरे
कळेलं शब्दांची गंमत

आस्था कळो मागची
सहज जमवे एकमत
पटे खोली विचाराची
उस्फुर्त येईल बहुमत

जन शक्ती येई सोबत
हीचं अनमोलइनामत
परिपूर्ण करता शब्दां
होऊनये कधी उन्मत्त

अर्थरुपलाभेल शब्दां
सदृश्यजादुई करामत
अक्षरात महान शक्ती
नको कुणा खुशामत


एकरूप महासागरही
जरी असेलं केचिन्मत
वाकून करतील नमन
जाणता शब्दअजमत

- हेमंत मुसरीफ पुणे
9730306996

## कवितेच्या लाटावर...

॥ गुरु ॥

गुरुने शिकविला धडा
गुरुने दाखविला छडा
गुरुने घडविला घडा
ठोकू ठोकूनी खडा
गुरु अपार ज्ञानी
गुरु आरपार सद्गुणी
गुरु जवळी गुरुत्व
पुसती आमचे लघुत्व
गुरुच जादुगार
गुरुच कलाकार
गुरुच दावेदार
आमुच्या जीवनाचा
गुरु मायेचा आगर
गुरु विद्येचा सागर
गुरु चारित्र्याचे सार
गुरु गुढ अपार
गुरु कणखर
गुरु रुबाबदार
गुरु जबाबदार
गुरु खट्याळ ही
गुरु नाटकी
गुरु सटकी
गुरु बेरकी
गुरु तरी स्वाभिमानी



©®दत्ता तरलगट्टी सर
पंढरपूर

सांग तूच आता विठूराया

मानवाचे ऐसे जगणे झाले विठूराया
त्यास स्वतःचे हीत अहीत न कळे
त्याची ऐसी मती झाली आहे जगी देवा
तयासी न्याय अन्याय कदापि न कळे


कैसे उमजावे त्यासी देवा मज न कळे
जाणूनी जीवनी! सोंग घेऊनी होई अज्ञानी
भेदाभेद असे अमंगळ सदैव या जीवनी
परि, सोडविना हाते हा स्वभावधर्म त्याचा

माणूस माणसाला न देखवे कदापि, जीवनी
समजेल तया, जया होईल तो ज्ञानी! मनी
मधु म्हणे, विठ्ठलासी कधी होईल हे जगती
भक्त जेव्हा करेल मनोभावे जीवनी देवभक्ती

वारी करीत तव भक्त येती विठ्ठला! पंढरीसी
तव भक्तीची ओढ लागावी सकल भक्तांसी
त्यासी उपरती व्हावी देवा हीच आहे मागणी
अन्यथा, तूच अवतार घे देवा! पुनःश्च जीवनी



काव्यरचना: मधुकर निलेगावकर, पुणे
९४२१३७५६९१



विठ्ठल विठ्ठल जय हरी

चंद्रभागेच्या तीरी
अलोट गर्दी सारी
आषाढी आली
बोला विठ्ठल विठ्ठल जय हरी

आनंद उधळला सारा
पंढरीच्या दिव्य दारी
विठुनामी गुंग वारकरी
बोला विठ्ठल विठ्ठल जय हरी

वेदना हरल्या साऱ्या
मोद नाचला घरोघरी
पावन झाली वारी
बोला विठ्ठल विठ्ठल जय हरी

धन्य जाहले विश्व सारे
आनंद मावेना उरी
दुमदुमली पंढरी
बोला विठ्ठल विठ्ठल जय हरी

बोला विठ्ठल विठ्ठल जय हरी
बोला विठ्ठल विठ्ठल जय हरी

गिरीश वसेकर (देशपांडे)
९४२२६५९४००

प्रत्येक आईची शाळा

आज माझं लेकरु पहिल्यांदा शाळेत गेलं !
पंधरा मिनिटे अगदी आई - आई करत रडलं,
बाई म्हणाल्या ताई तुम्ही जरा वेळ थांबा
हे ऐकून काय सांगू मलाच बरं वाटलं बाबा !
रडत तो होता पण आतून मी तुटत होते,
झाडा आडुन त्याला रडतांना पाहत होते !
म्हणलं घेऊन येते लगेच पहिलाच तर दिवस आहे,
माझं बाळ रडतंय मला कोण अडवणार आहे !
भरून आलेले डोळे पुसत शाळेसमोर मी गेले
रडण्याचा आवाज नाही, मुलं खेळात रमलेले !
आता मात्र जिवाची घालमेल सुरू झाली
बाळं गेलं शाळेत आई बाहेरच राहिली !
वाटलं होतं चार दिवस जाईन मी बरोबर,
मुलगा छान राहतो म्हणून सांगितलं मला गेटवर !
आनंद झाला की दुःख हे मलाच माझं कळेना,
आता दोन तास त्याच्या शिवाय मन काही लागेना !
काय माहीत शाळेत बसतो की नाही हा मी सगळी कडे सांगायचे,
त्याच्या वर ढकलून मी माझीच तळमळ लपवायचे !
पक्षी पंखात बळ भरून उडायला शिकु लागला,
चिमणीचा जीव अगदी टांगणीला लागला !
मिनिटं - मिनिटं मोजत तास गेले दोन
शाळे बाहेरून लावला मी बाईंना फोन !
म्हणलं झाली वेळ आता घेऊन जाते त्याला,
जड जीभेने म्हणलं उद्या पाठवीण शाळेला !
पळत - पळत माझं बाळ येऊन मला बिलगलं
ते हसत होतं पण माझं मन खूप रडलं !
पाहता - पाहता त्याला आता रोजची झाली शाळा,
काय सांगू, दोन तासात मी घड्याळ बघते किती वेळा !!
काय सांगू, दोन तासात मी घड्याळ बघते किती वेळा !!



✍️ सौ. प्रियंका गौरव जावळे.

मी वृद्धाश्रम

तिसरा प्रहर निःसंकोचपणे
घालविण्याचा आनंदाश्रम
येथे कोणालाही येता येते
ना आरक्षण ना जातीचे बंधन

ना वयोमर्यादा ना अटी कायदा
कोणीही घेवू शकतो फायदा
इथे ना तोरा, ना कुणाला मान
व्यक्ति स्वातंत्र्य स्वतःचाच अभिमान

कोणीही नसताना सगेसोयरे
सर्व येथे एकाच नात्यातले
सर्व सणांचे मुक्त स्थान
राखती कायम एकमेकांचा मान

तरी समाजात का बदनाम
जेंव्हा असे हे आनंद धाम
स्वेच्छेने ना कोणी येते
पण सुख भरभरून येथे पावते

आयुष्यातील चुकांचा हिशोब
सरतेशेवटी इथे उमजते
शेवटी.....कोण काय नेते
जसे येते तसेच जाते...
तसेच जाते...........



@ संजय काव्या 7743918559

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे–४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559